# प्रेसनोट

दिनांक– २८/०८/२०१८.

## वसई येथे पंचायत समिती, शिक्षण विभागामधील विस्तार अधिकाऱ्यास लाच स्विकारताना अटक

दिनांक २८/०८/२०१८ रोजी, वसई, जिल्हा पालघर येथील पंचायत समिती, शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी **ब्रिजेश बाकेलाल गुप्ता**, वय ४१ यांना यातील तक्रारदार यांच्याकडून २,५०,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीप्रमाणे

यातील तक्रारदार महिला या मुख्याध्यापीका असुन, त्यांच्या शाळेस इयत्ता ६ ते १२ वी अशी मान्यता मिळवून देण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे ६,००,०००/– रुपये लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती ५,००,०००/– रुपये देण्याचे ठरले. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदवली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन असीबी, ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करुन लोकसेवक **ब्रिजेश बाकेलाल गुप्ता** यांना तक्रारदार यांचेकडून कामाची ॲडव्हान्स रक्कम म्हणून २,५०,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, गुन्हयाचा पुढील तपास श्री. वाल्मीक पाटील, पोलीस उप अधीक्षक, असीबी, ठाणे हे करत आहेत.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

१) टोल फ्री क्र. :– **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :– **022–25427979**
३) ई–मेल आयडी :– **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :– **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner